# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१८

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक १५ मार्च, २०१८ / फाल्गुन २४, १९३९ ( शके )**

| | |
|---|---|
| (१) आदिवासी विकास मंत्री<br>(२) उद्योग व खनिकर्म मंत्री<br>(३) उर्जा, नवीन व नवीकरणीय उर्जा, राज्य उत्पादन शुल्क मंत्री<br>(४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री<br>(५) सहकार, पणन व वस्त्रोद्योग मंत्री | यांचे प्रभारी विभाग |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४१**

---

### वरोरा शहरात (जि.चंद्रपूर) महावितरण कंपनीने नियमबाह्यरित्या तीन रोहित्रे बसविल्याबाबत

**(१) * ११३२९१ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरोरा शहरात (जि.चंद्रपूर) महावितरण कंपनीने डी.पी.डी.सी, एस.ई.पी/पी.एस.पी योजनेतंर्गत अधिकारी व कंत्राटदार यांनी संगनमताने नियमबाहय कामे मंजूर करून मोहबाळा गावाला लागून असलेल्या मोकाशे लेआऊट, अभ्यंकर वार्ड नविन लेआऊट, माढळी गावातील नविन लेआऊट येथे नियमबाह्यरित्या ११ केव्हीच्या २५ खांबांची लाईन टाकून तीन रोहित्रे बसविली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गैरकारभाराची चौकशी करुन संबधितांवर कारवाई करण्यासाठी वरोरा नगरपरिषदेचे सभापती यांनी अधिक्षक अभियंता, महावितरण कंपनी, चंद्रपूर यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार संबधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) महावितरण कंपनीमार्फत चौकशी करण्यात आली असून त्यामध्ये कोणीही दोषी आढळून आलेले नाहीत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद उपविभागातील गंगापूर व पैठण या भागात कृषीपंपाच्या विद्युतीकरणाच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(२) * ११४९०४ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद उपविभागातील गंगापूर व पैठण या भागात कृषीपंपाचे विद्युतीकरण करण्यासाठी टी-२६ ते टी-२९ उच्चदाब वाहिनी टाकणे, १०० KVA रोहित्र बसविणे इ. कामांमध्ये कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कामाचा कार्यारंभ आदेश व कामांची कोट्यवधी रुपयांची देयके मुख्य अभियंता यांनी एकाच दिवशी कंत्राटदारास दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार मुख्य अभियंत्याविरुद्ध कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी व हिंगोली जिल्हयातील महाविद्‌यालयांनी केंद्र सरकारच्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत केलेला गैरव्यवहार

**(३) * १०८१९५ श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी व हिंगोली जिल्हयातील एकूण ८३ महाविद्‌यालयांनी समाजकल्याण व आदिवासी विभागाकडून केंद्र सरकारच्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत ४ कोटी २९ लाख रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे दिनांक २२ डिसेंबर, २०१७ रोजी निदर्शनास आल्यानंतर संबंधित महाविद्‌यालयांनी शिष्यवृत्तीची संपूर्ण रक्कम शासनाकडे दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ पर्यंत जमा करण्याचे आदेश आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी, कळमनूरी यांनी दिले असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या दोन जिल्हयातील किती महाविद्‌यालयांनी शिष्यवृत्तीची रक्कम उपरोक्त आदेशाप्रमाणे दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ पर्यंत शासनाकडे परत केली आहे,

(३) असल्यास, ज्या महाविद्यालयांनी गैरव्यवहार करुन मिळविलेली रक्कम शासनाकडे जमा केली नाही अशा महाविद्यालयांना शासन नियमानुसार किती टक्के व्याज दंड म्हणून आकारण्यात येणार आहे, तसेच सदर रक्कम वसुल करण्याकरीता कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा करण्यात येत आहेत,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे आहे.
(२) सदरहू दोन जिल्हयात १० महाविद्यालयाच्या व्यवस्थापकांनी वसूलीची रक्कम भरणा केली आहे.
(३) आदिवासी विकास विभागाच्या दिनांक २२.०९.२०१७ च्या शासन परिपत्रकानुसार संबंधित महाविद्यालयांकडून वसुलीची कार्यवाही सुरु आहे.
(४) भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती गैरव्यवहार प्रकरणी स्थापन केलेल्या विशेष चौकशी पथकाच्या अहवालावर केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने आदिवासी विकास विभागाच्या दि.२२.०९.२०१७ च्या शासन परिपत्रकान्वये प्रकल्प स्तरावर समिती गठीत करण्यात आली असून सदर समिती महाविद्यालयांच्या रकमा निश्चित करुन रक्कम वसूलीची कार्यवाही करत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील सेवाभावी ब्राम्हण नागरी सहकारी पतसंस्थेत झालेला गैरव्यवहार

**(४) * ११४४८० श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड),**

**श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील सेवाभावी ब्राम्हण नागरी सहकारी पतसंस्थेत १६ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.

सन २०१६-१७ च्या लेखापरिक्षण अहवालानुसार रु. १५.४६ कोटी रक्कमेचा अपहार झाल्याचे आढळून आले आहे.

(२) या संस्थेच्या सन २०११-१२ ते २०१५-१६ या ५ वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची छाननी करण्यात आली.

त्याप्रमाणे लेखापरीक्षकांनी संस्थेचे मागील ५ वर्षाचे फेरलेखापरिक्षण करण्याची शिफारस केली आहे. त्यानुषंगाने सन २०११-१२ ते २०१५-१६ या ५ वर्षाचे फेरलेखापरिक्षण करणेसाठी श्री.एस.व्ही. सासवडकर, लेखापरिक्षक श्रेणी-१, सहकारी संस्था, चिपळूण यांची नियुक्ती केली आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

दरम्यान संस्थेच्या सन २०१६-१७ या कालावधीच्या लेखापरिक्षण अहवालानुसार पतसंस्थेच्या अध्यक्षांनी संस्थेचा संचालक, व्यवस्थापक व अल्पबचत एजंट यांचेवर दिनांक ३१.१.२०१८ रोजी पोलीस स्टेशन, चिपळूण येथे गुन्हा दाखल केलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील आदिवासी ठाकूर जमातींच्या गाव व वाड्या-वस्त्यांचा अद्याप विकास न झाल्याबाबत

**(५) * १०८५७२ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील आदिवासी ठाकूर या मागास जमातींची गावे, वाडया व वस्त्या पिढयानपिढया कायमस्वरूपी डोंगरावर दूर्गम भागात वास्तव्य करीत असून सदर भागात दळणवळणासाठी रस्ता, इतर पायाभूत सुविधा तसेच विद्युत पुरवठा देण्यात आलेला नसल्याने तेथील वाड्या-वस्त्यांचा विकास झालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही सर्व गावे व वाड्या-वस्त्या हया मुख्य रस्त्यापासून किंवा शाळेपासून ४ ते ५ कि.मी.अंतरावर असून रस्ता नसल्यामुळे त्याठिकाणी कोणत्याही प्रकारचे वाहन येत नसल्याने ग्रामस्थांना, रूग्णांना तसेच मुलांना शाळेत जाण्यासाठी पायी प्रवास करावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार सदर गाव व वाड्या-वस्त्यांच्या विकासासाठी निधी उपलब्ध करुन पायाभूत सुविधांची कामे करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१), (२), (३) व (४) रायगड जिल्हयामध्ये एकूण १५ तालुके असून त्यापैकी ६ तालुके आदिवासी उपयोजना क्षेत्रात समाविष्ठ आहेत. अलिबाग तालुका आदिवासी उपयोजना क्षेत्रात येत नसल्याने सदर

तालुक्यामध्ये सामुहिक स्वरुपाची कामे आदिवासी उपयोजना घटक कार्यक्रमांतर्गत करता येत नाही. दुर्गम भागातील आदिवासी उपयोजनेंतर्गत येणारी गावे रस्त्यांना जोडण्यासाठी जिल्हा नियोजन समितीमध्ये त्यांना प्राधान्य देणेकरीता सूचना देण्यात आली आहे.

-----------------

## वडवली ते वावे (ता.कर्जत, जि.रायगड) या गावादरम्यानच्या उल्हास नदीवरील पुलाची दुरुस्ती करण्याबाबत

**(६) * ११४०८३ श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडवली ते वावे (ता.कर्जत, जि.रायगड) या गावादरम्यान उल्हास नदीवर असलेल्या पुलाची दुरवस्था झाल्याने पुलावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांची व वाहनचालकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पुलाची त्वरीत दुरुस्ती करण्याबाबतची मागणी तेथील नागरीकांनी तसेच लोकप्रतिनिधीनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडे केली असतानाही अद्याप विभागाने कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त पुलाची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे. भिवपूरी निर्मिती केंद्राच्या साहित्य व उपकरणाच्या वाहतूकीसाठी भिवपूरी पॉवर हाऊस ते भिवपूरी रेल्वे स्थानकापर्यंत वडवली-वावे गावाजवळील उल्हास नदीवरील बांधण्यात आलेल्या ट्रॉली ट्रॅकच्या देखभालीची व्यवस्था करण्यासाठी टाटा पॉवर कंपनीद्वारे पादचारी पूल बांधण्यात आला आहे.

(२), (३) व (४) मा.मंत्री (सार्वजनिक बांधकाम) वा सार्वजनिक बांधकाम विभागाकडे या संदर्भातील निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नसल्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने अवगत केले आहे. परंतु कडाव ग्रामपंचायतीच्या हद्दीत वडवली गावाजवळ उल्हासनदीवरील साकव दुरुस्त करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने त्यांच्या दिनांक १२.२.२०१८ च्या पत्रान्वये टाटा पॉवर कंपनीस विनंती केलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुक्ताईनगर (जि.जळगांव) तालुक्यातील कुर्की-पुरनाड येथे १३२ के.व्ही.ए. उपकेंद्र कार्यान्वित करण्याबाबत

**(७) * ११५०२२ श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर (जि.जळगांव) तालुक्यातील कुर्की-पुरनाड येथे वीज पुरवठा वारंवार खंडित होत असल्याने प्रस्तावित १३२ के.व्ही.ए. उपकेंद्र तात्काळ कार्यान्वित करण्याबाबत स्थानिकांनी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले,

(३) त्यानुसार वीज वितरण प्रणालीमध्ये सुधारणा होण्याकरिता भरीव निधी उपलब्ध करुन प्रस्तावित १३२ के.व्ही.ए. सबस्टेशन तात्काळ कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) महापारेषण कंपनीने सदर १३२/३३ के.व्ही. उपकेंद्राचा राज्य पारेषण उपक्रमाच्या पंचवार्षिक योजनेच्या आराखड्यात (सन २०२२-२३) समावेश केला असून त्यादृष्टीने आवश्यक ती कार्यवाही सन २०१८-१९ पासून महापारेषण कंपनीमार्फत सुरु करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्हयातील जिल्हा परिषद शाळांमध्ये विनाखंडित विद्युत पुरवठा होण्याबाबत

**(८) * ११०७५३ श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील १२८ जिल्हा परिषद शाळांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आल्यामुळे जिल्हा परिषदेच्या उपाध्यक्षा यांनी महावितरण कंपनीचे अधीक्षक अभियंता यांचेकडे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये तक्रार केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्युत पुरवठा खंडित केल्यामुळे शाळेतील ई-लर्निंग उपक्रमावर विपरित परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार शाळांना विनाखंडित विद्युत पुरवठा करण्याबाबत व वीजपुरवठा खंडित करणाऱ्या संबधितांविरुद्ध कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) सदर प्रकरणी महावितरण कंपनीकडे तक्रार करण्यात आली परंतु १२८ जिल्हा परिषद शाळांपैकी फक्त ८ शाळांचा वीज पुरवठा थकबाकीमुळे तात्पुरत्या स्वरुपात खंडीत करण्यात आला आहे.

(२) व (३) संबंधित जिल्हा परिषद शाळांकडे एकूण रु. २.७३ लाख वीज बिल थकीत असल्याने संबंधित शाळांना वीज बिल भरण्याबाबत विनंती करण्यात आली आहे. संबंधित शाळांनी वीज बिलाचा भरणा करताच वीज पुरवठा सुरु करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्हयातील संत चोखामेळा वसतीगृहाच्या नवीन इमारतीचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(९) * १०७९४९ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम)** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील संत चोखामेळा वसतीगृहाच्या नवीन इमारतीच्या बांधकामासाठी शासनाकडून सुमारे ५८ कोटी रूपयांचा निधी मंजूर होऊनही सदर वसतीगृहाचे बांधकाम करण्यासाठी कंत्राटी एजन्सी ठरत नसल्यामुळे वसतीगृहाचे काम प्रलंबित असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वसतीगृहाची इमारत १० माळ्यांची असून त्याची क्षमता ५०० विद्यार्थी इतकी असून त्यांच्या व्यवस्थेकरीता ५८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या इमारतीचे काम नागपूर सुधार प्रन्यास किंवा सार्वजनिक बांधकाम विभागाला द्यावयाचे याबाबत शासकीय स्तरावर अद्याप कोणताही निर्णय होत नसल्याने सदरहू काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने वसतीगृहाच्या इमारतीचे काम तातडीने होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१), (२) व (३) सदर वसतिगृहाचे बांधकाम नागपूर सुधार प्रन्यासद्वारे करण्याचे शासन शुध्दीपत्रक क्र.बीसीएच-२०१३/प्र.क्र.३६/ बांधकामे, दि.३/२/२०१८ अन्वये निश्चित करण्यात आले आहे व त्याप्रमाणे सदर वसतिगृह बांधकामाचा निधी रु.५८,४२,४५,९९९/- नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर प्राधिकरणास हस्तांतरीत करण्यात आलेला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंधेरी पूर्व येथील मरोळ औदयोगिक वसाहतीतील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील झोपड्यांची पात्रता बनावट कागदपत्रांन्वये निश्चित केल्याबाबत

**(१०) * ११५१२१ श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी पूर्व येथील महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळाच्या मरोळ औदयोगिक वसाहतीत झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यात येत असून सदर पुनर्वसन योजनेच्या कामास २२ वर्षांचा कालावधी होऊनही योजना अद्यापपर्यंत अपूर्ण आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, योजनेतील निविदा स्वीकृती करताना दिनांक १ जानेवारी, १९८५ नुसार सुमारे ३००० झोपडीधारक, दिनांक १ जानेवारी, १९९५ नुसार ४६०० झोपडीधारक व सुधारीत शासन निर्णयानुसार दिनांक १ जानेवारी, २००० नुसार ४७९० झोपडीधारकांना पात्र करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१५ ते सन २०१८ या कालावधीत अपात्र झोपडीधारकांनी प्राधिकरणाकडे अपील दाखल करून मोठ्या प्रमाणावर झोपड्या पात्र करताना सदर झोपडीधारकांनी सादर केलेले वीजदेयक, गुमास्ता लायसन्स व इतर अन्य पुरावे यांची प्राधिकरणाने संबंधित खात्याकडून पडताळणी करून न घेताच झोपड्यांची पात्रता निश्चित केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, माहितीच्या अधिकारांतर्गत मिळालेल्या कागदपत्रांची छाननी केली असता सदर झोपडपट्टीधारकांची कागदपत्रे ही बनावट असल्याची माहिती समोर आली असून त्याबाबत लोकप्रतिनीधी व समाजसेवी कार्यकर्त्यांनी प्राधिकरणाकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार संबधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच पात्र झोपडीधारकांना लाभ देऊन झोपडपट्टी पुनर्वसन योजना पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

निविदा स्विकृती करताना दिनांक ०१/०१/१९८५ च्या पुर्वीचे सुमारे ३००० झोपडीधारक पात्र ठरत होते व त्यांना १८० चौ फुट बांधकाम अनुज्ञेय होते. तथापि दिनांक ०१/०१/१९९५ च्या मतदार यादीनुसार पात्रतेची संख्या ४६०० झाली. शासन राजपत्र दिनांक २७/०८/१९९६ नुसार दिनांक ०१/०१/१९९५ पुर्वीच्या झोपडया पात्र ठरविण्यात आल्या आहेत व अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र १८० चौ.फुटावरुन २२५ चौ. फुट करण्यात आले आहे. तसेच गृहनिर्माण विभाग शासन निर्णय दिनांक २२/०७/२०१४ अन्वये दिनांक ०१/०१/२००० व त्यापुर्वीच्या झोपडया व झोपडीधारकांची पात्रता ठरविण्याचा निर्णय पारित केला आहे. त्यानुसार सदर योजनेत एकूण ५०९० झोपडयांच्या पात्रतेच्या छाननीचे काम सुरु आहे. यापैकी आजमितीस ४८७९ झोपडीधारक पात्र ठरलेले आहेत. तसेच आजमितीस सदर योजनेत एकूण ३९१९ पात्र झोपडीधारकांना कायमस्वरुपी सदनिका वाटप करण्यात आल्या असून उर्वरित ११७१ झोपडीधारकांचे पुनर्वसन दि. ३०/०४/२०१९ पर्यंत करण्याचे नियोजन आहे.

(३) हे खरे नाही.

अपिल प्राधिकरण म्हणजे उप अभियंता म.औ.वि. महामंडळ उप विभाग मरोळ यांनी गृहनिर्माण विभाग सुधारित शासन निर्णय दि. १६/०५/२०१५ मध्ये नमूद निकषानुसार झोपडयांची पात्रता निश्चित केली आहे.

(४) हे अंशत: खरे आहे.

काही झोपडीधारकाच्या कागदपत्रांच्या सत्यते बाबत महामंडळाकडे श्री.इमरान शेख, श्री. भिमेश मितुला, श्री. संतोष गिरी, श्री. जगत गौतम यांच्याकडून अनुक्रमे दि. २२/०६/२०१६, दिनांक १०/०७/२०१७, दि. २३/०८/२०१७ दि. ०२/०५/२०१७ रोजी तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. श्री. इमरान शेख यांच्या तक्रारीनुसार श्री. बाळासाहेब जाधव यांना वाटप केलेले दोन व्यापारी गाळे महामंडळाने परत घेतले आहेत व ते सीलबंद करण्यात आले आहेत. तसेच श्री.भिमेश मितुला, श्री.जगत गौतम व श्री.संतोष गिरी यांचे तक्रारीनुसार संबंधित विभागाकडून कागदपत्रांची सत्यता पडताळण्याबाबत महानगरपालिका व वीज कंपनी यांना विनंती करण्यात आली आहे. त्यांच्याकडून अहवाल प्राप्त होताच सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) व (६) आजमितीस सदर योजनेत एकूण ३९१९ पात्र झोपडीधारकांना कायमस्वरुपी सदनिका वाटप करण्यात आल्या असून उर्वरीत ११७१ झोपडीधारकांचे पुनर्वसन दिनांक ३०/०४/२०१९ पर्यंत करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## लातूर जिल्हयात दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजनेंतर्गत सिंगल फेज रोहित्राची कामे अपूर्ण असल्याबाबत

**(११) * १११९८० श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयातील सतत नादुरुस्त होत असलेले सिंगल फेज रोहित्र व त्यावर वाढलेल्या अतिभारामुळे सर्व गावात दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजनेंतर्गत सिंगल फेज रोहित्रांची दुरुस्तीची कामे करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.उर्जा मंत्री यांचेकडे दिनांक २९ जून, २०१७ रोजी लातूर येथे झालेल्या आढावा बैठकीत केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयातील नादुरुस्त रोहित्र बदलण्यासाठी वाहतूक खर्च शेतकऱ्यांकडून करण्यात येऊ नये व तो संपूर्ण खर्च महावितरण विभागानेच करण्याबाबत तसेच जिल्हयातील शेती पंपाच्या शेकडो प्रलंबित वीज जोडण्यांचे तातडीने सर्वेक्षण करून वीज जोडण्या देण्याबाबत मा.उर्जा मंत्री यांनी दिनांक २९ जून, २०१७ रोजी लातूर येथील आढावा बैठकीत आदेश दिलेले असतानाही अद्याप कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार दीनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेंतर्गत सिंगल फेज रोहित्राची कामे करण्याबाबत, रोहित्र बदलण्यासाठी वाहतूक खर्च महावितरणने करण्याबाबत व प्रलंबित कृषी पंप वीज जोडण्या तात्काळ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

तथापि रोहित्र दुरुस्तीची कामे पं. दिनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजनेअंतर्गत प्रस्तावित नाहीत.

(२) हे खरे नाही.

नादुरुस्त रोहित्र बदलण्यासाठी अथवा दुरुस्तीसाठी महावितरण कंपनीकडून त्याची ने-आण केली जाते. त्यासाठी लातूर जिल्हयाअंतर्गत रोहित्र बदलण्यासाठी वाहतुकीचे कामासाठी एकूण १७ निविदा काढण्यात आलेल्या असून रु. १२६ लाख रकमेची कंत्राटे देण्यात आली आहेत. तसेच लातूर जिल्हयात मराठवाडा विदर्भ कृषीपंप ऊर्जीकरण योजनेंतर्गत एकूण ७७७० कृषीपंपाना जेष्ठता यादीनुसार विद्युत पुरवठा करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्हा सहकारी बँकेची कर्जे शासनाने निर्लेखित केल्याबाबत

**(१२) * ११३४६८ श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हा सहकारी बँकेने सन २०१२-१३ व २०१३-२०१४ मध्ये सुमारे ५२ संस्थांना ८ कोटी ५२ लाख रुपयांचे कर्ज दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संस्थांना कोणतेही तारण न घेता कर्जांचे वाटप करण्यात आले असून सदर संस्था दिवाळखोरीत निघाल्याने व संस्थांचे पदाधिकारी बेपत्ता असल्याने उक्त संस्थांची नोंदणी रद्द करुन त्यांचे ८ कोटी ५२ लाख रुपयांची कर्ज शासनाकडून निर्लेखित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित संस्थांच्या बेजबाबदार व गैरकारभार केलेल्या पदाधिकाऱ्यांची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) अंशत: खरे आहे. औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने ५२ सहकारी संस्थांना केलेले कर्ज वाटप सन १९७८ पासूनचे असून मुद्दल रूपये २७२.३० लाख व व्याज रूपये ५७९.७० लाख असे एकूण रूपये ८५२.०० लाख आहे.

(२) अंशत: खरे आहे. उक्त संस्थांची ८ कोटी ५२ लाख रूपयांची कर्जे शासनाकडून निर्लेखित करण्यात आलेली नाहीत. तथापि, दिनांक २०/०९/२०१४ च्या औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वार्षिक साधारण सभेतील ठराव क्र.८ नुसार व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ च्या नियम ४९ मधील तरतूदीनुसार एकूण ५२ सहकारी संस्थांचे थकीत कर्ज मुद्दल व व्याज एकूण रूपये ८.५२ कोटी बँकेने वसूलीचा हक्क कायम ठेवून थकीत कर्जे निर्लेखित केलेली आहेत.

(३) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांचे आदेश दिनांक ३१/१२/२०१५ अन्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अंतर्गत बँकेने ५२ सहकारी संस्थांच्या निर्लेखित केलेल्या व्यवहाराची चौकशी करण्यासाठी श्री.छत्रीकर डि.टी., विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (लेखापरिक्षण) औरंगाबाद यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक केली.

चौकशी अधिकारी यांनी चौकशी अहवाल सादर केलेला असून सदर अहवालानुसार बँकेने सहकार कायद्यातील तरतूदीनुसार निर्लेखनाची कार्यवाही विहीत पध्दतीने केलेली आहे. त्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची रक्कम समाजकल्याण विभागाकडे अखर्चित राहिल्याबाबत

**(१३) * ११४८४७ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचे सुमारे ६६७ कोटी रुपये समाजकल्याण विभागाकडे अखर्चित असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांना अदा न केल्यास मार्च अखेरीस ही रक्कम अखर्चित राहणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिष्यवृत्तीची सदर रक्कम विद्यार्थ्यांना तातडीने अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) नाही, अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना तातडीने शिष्यवृत्ती अदा करण्याच्या दृष्टीने, दिनांक २९.०१.२०१८ च्या शासन निर्णयान्वये सविस्तर कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. त्यानुसार सन २०१७-१८ मध्ये नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचे अर्ज ऑफलाईन पध्दतीने स्विकारुन तसेच नुतनीकरणाचे अर्ज विभागाच्या महाईस्कॉल प्रणालीवरुन निकाली काढून पात्र विद्यार्थ्यांना लाभ त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## इस्लामपूर (ता.वाळवा, जि.सांगली) येथे सामाजिक न्याय विभागाचे मागासवर्गीय मुले व मुलींचे वसतिगृह सुरु करण्याबाबत

**(१४) * ११४४६७ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इस्लामपूर (ता.वाळवा, जि.सांगली) येथे सामाजिक न्याय विभागाचे मागासवर्गीय मुले व मुलींसाठी वसतिगृह बांधण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वसतीगृहाचे उद्घाटन मा.सामाजिक न्याय मंत्री यांच्या हस्ते दोन वर्षांपुर्वी होऊनही अद्यापही वसतीगृह सुरु करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वसतीगृह अद्यापपर्यंत सुरु न होण्याची कारणे काय आहेत
(४) असल्यास, सदर वसतीगृह तात्काळ सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.
(२), (३) व (४) मुलांच्या वसतीगृहाची कामे पूर्ण झालेली असून, विद्युत जोडणी सारखी किरकोळ कामे बाकी आहेत. तर मुलींच्या वसतीगृहाचे संरक्षण भिंतीसह काही कामे प्रगती पथावर असून, ही कामे मार्च २०१८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## मौजा गडेगाव (ता.लाखनी, जि.भंडारा) येथील दलित वर्ग सहकारी संस्थेतील सभासदांना संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला न मिळाल्याबाबत

**(१५) * ११३५३१ श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा गडेगाव (ता.लाखनी, जि.भंडारा) येथील दलित वर्ग सामुदायिक सहकारी संस्थेतील सभासदांना अशोक लेलँड प्रा.लि. कंपनीच्या प्रकल्पासाठी संपादित केलेल्या ६१.५३ एकर जमिनीचा मोबदला अथवा नोकरी गेल्या ३५ वर्षांपासून न मिळाल्याने संस्थेमार्फत सभासदांनी विभागीय आयुक्त, नागपूर व उपायुक्त, पुनर्वसन, नागपूर यांना दिनांक १ ऑक्टोबर, २०१६ रोजी व जिल्हाधिकारी, भंडारा यांना दिनांक ३० नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निवेदन देऊनही अद्याप कोणतीही कार्यवाही न झाल्याने लोकप्रतिनिधींद्वारे दिनांक ६ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास उपायुक्त पुनर्वसन, नागपूर यांना याबाबत निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली काय,

(३) असल्यास, त्यानुसार अशोक लेलँड प्रा.लि. कंपनीने नोकरी व मोबदला न दिल्याने कंपनी विरुद्ध कारवाई करण्याबाबत तसेच नियमानुसार तातडीने मोबदला मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे आहे.

(२) मा.लोकप्रतिनिधी यांच्या पत्राच्या अनुषंगाने प्रकरणाची वस्तुस्थिती प्रभारी अधिकारी (भूसंपादन) जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा यांनी त्यांचे दिनांक ०१/०७/२०१७ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(३) व (४) औद्योगिक क्षेत्रासाठी मौजे गडेगाव, चिखली (हमेशा) व राजेगाव येथील ६०.८७ हे. आर. सरकारी व ८१.८४ हे. आर. खाजगी क्षेत्र ताब्यात घेण्यात आले. शासन पत्र क्र. आयडीसी १०८३ (४९८१) (४९५६) उद्योग-१४ दिनांक ०१/०७/१९८३ अन्वये ८१.८४ हे. आर. खाजगी क्षेत्रास देय नुकसान भरपाईचे दरास मंजुरी देऊन नुकसान भरपाईपोटी २०,०९,३६४ इतकी रक्कम महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने विशेष भूसंपादन अधिकारी (सा) भंडारा यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. महामंडळाच्या मऔवि अधिनियम १९६१ मधील कलमानुसार शेतकऱ्यांना महामंडळाच्या सेवेत सामावून घेण्याची तरतूद नाही. मे. अशोक लेलँड कंपनी यांनी त्यांच्या कंपनीमध्ये ज्यांच्या जमीनी संपादित करण्यात आल्या होत्या त्यांना/ त्यांच्या पाल्यांना एकूण ५९ पैकी ४१ लोकांना नोकरीत सामावून घेतले असून उर्वरित १८ लोकांना त्यांचे शैक्षणित पात्रता नसल्यामुळे तसेच ते नोकरी करण्यास इच्छुक नसल्यामुळे ते कंपनी सोडून गेल्याचे कंपनीने दिनांक १०/११/२०१४ अन्वये कळविले आहे.

प्रश्नाधीन जमीन शासनाची असून ती फक्त को-ऑपरेटिव्ह फार्मींग सोसायटीला फ्री प्रिमियवर फक्त शेती करिता देण्यात आली होती. कोणत्याही व्यक्तीच्या नावे झाल्याचे सरकारी अभिलेख्यावरुन दिसून येत नसल्यामुळे सदर जमीन संपादित न करता महाराष्ट्र शासन उद्योग,उर्जा व कामगार विभाग यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला देणेकरिता सरकार जमा करण्यात आली. त्यामुळे मोबदला देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील बँकांनी साखरेच्या मूल्यांकन दरात १२० रुपयांची घट केल्याबाबत

**(१६) * १०८८९४ श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बँकांनी साखरेच्या मूल्यांकन दरात १२० रुपयांची घट केल्याचे दिनांक १८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवघ्या १५ दिवसांत २३० रुपयांची मूल्यांकन दरात घट झाल्याने साखर कारखानदारांसमोर अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार साखरेचा बफर स्टॉक करण्याबरोबरच साखरसाठ्यावरील नियंत्रण उठविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.

(२) अंशतः खरे आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने दि.१९/१२/२०१७ रोजीचे साखर मुल्यांकन दर रु.३१००/- प्रति क्विंटल वरुन दि.१८/०१/२०१८ रोजी रु.२९७०/- प्रति क्विंटल केलेले होते. म्हणजेच एक महिन्यामध्ये बँकेने साखर मुल्यांकन दर रु.१३०/- प्रति क्विंटलने कमी केलेले होते. परंतु सद्यस्थितीत दि.१६/०२/२०१८ रोजीचे सुधारित साखर मुल्यांकन दर रु.३१००/- प्रति क्विंटल करण्यात आलेले आहे.

(३) साखरेचा बफर स्टॉक करण्याबरोबर साखरसाठा नियंत्रण उठविण्याबाबत आवश्यकतेप्रमाणे उपाययोजना आखण्याबाबत केंद्र शासनाबरोबर पाठपुरावा करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्हयातील रेशीम उद्योजक शेतकऱ्यांना कीटक संगोपनगृह अनुदानाची रक्कम देण्याबाबत

**(१७) * ११००५५ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील रेशीम उद्योजक शेतकऱ्यांना सन २०१३-१४ व २०१४-१५ लाभार्थ्यांचे कीटक संगोपनगृह अनुदानाची रक्कम अद्यापही देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेतकऱ्यांच्या कीटक संगोपनगृहाच्या अनुदानाची रक्कम त्यांना मिळावी याकरीता संबधित शेतकऱ्यांकडून व परभणी येथील लोकप्रतिनिधींकडून वारंवार मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार लाभार्थी शेतकऱ्यांना कीटक संगोपनगृहाच्या अनुदानाची रक्कम देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.

(२) होय.

(३) अ) सन २०१५-१६ पूर्वी किटक संगोपन गृह अनुदान प्रस्ताव हे केंद्र पुरस्कृत सीडीपी योजनेअंतर्गत देण्यात येत होते. सन २०१५-१६ पासून सीडीपी योजना बंद झालेली असून १४ व्या वित्त आयोगाचे शिफारसीनुसार केंद्र पुरस्कृत योजनांचे रुपांतर अथवा अभिसरण पद्धतीने राबविण्याच्या सूचना होत्या. त्याअनुषंगाने राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत शासन निर्णय, क्रमांक राकृयो २०१५ /प्र.क्र.११४/ रेशीम कक्ष, दिनांक २९ जुन, २०१६ नुसार १२०० किटक संगोपन गृह उभारणीसाठी रु.१०९७.२५ लक्ष च्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

ब) सदरच्या शासन निर्णयात अट क्रमांक ८ नुसार किटक संगोपन गृह बांधकाम अनुदान हे सन २०१५-१६ या वर्षात तुती लागवड केलेल्या शेतक-यांसाठी अनुज्ञेय आहे. सन २०१५-१६ पुर्वीच्या संगोपन गृहास अनुदान दिले जाणार नाही असे नमूद आहे. त्यानुसार पात्र लाभार्थ्यांचे अनुदान वितरीत केलेले आहे.

क) प्रस्तुत शासन निर्णयातील तुती लागवड वर्षाची अट पुर्ण करीत नसलेल्या मात्र सन २०१५-१६ पूर्वीचे लागवड असलेल्या व सन २०१५-१६ मध्ये संगोपन गृहाचे बांधकाम केलेल्या १६९ लाभार्थ्यांना राष्ट्रीय कृषी विकास योजनेमधुन निधी वितरीत करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असुन त्यापैकी परभणी जिल्ह्यातील २४ लाभार्थ्यांचा समावेश आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शबरी आदिवासी घरकुल योजनेंतर्गत घरकुलांची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(१८) * १०९४५३ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठी शबरी आदिवासी घरकुल योजना सन २०१३ मध्ये सुरु करण्यात आली असून गेल्या दोन वर्षांमध्ये राज्यात या योजनेंतर्गत २१ हजार घरे मंजुर झालेली असताना आतापर्यंत केवळ २५४ घरकुलांचे काम पूर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेतंर्गत विशेषत: पुणे जिल्हयात सन २०१६-१७ या वर्षात ८०७ पैकी केवळ १२६ घरांची पूर्तता करण्यात आलेली असून घराच्या अनुदानाची किंमत १ लाखापर्यंत वाढविण्यात आली असून, ४२.७३ कोटी रुपये पहिला हप्ता खर्च करून देखील नियोजनाअभावी, उर्वरित नागरिक अजूनही घरांच्या प्रतिक्षेत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेतंर्गत घरांची कामे करण्यास झालेल्या विलंबाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार उर्वरीत घरांची कामे तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) सन २०१२-१३ या वर्षापासून शबरी आदिवासी घरकुल योजना सुरु झाली असून सन २०१५-१६ व २०१६-१७ या वर्षात अनुक्रमे ७००० व १४००० असे एकुण २१००० घरकुले मंजुर आहेत. माहे जानेवारी, २०१८ अखेर ६८७० घरकुलांचे बांधकाम पुर्ण झाले असून उर्वरित घरकुलांचे बांधकाम सुरु आहे.

सन २०१६-१७ या वर्षात शबरी आदिवासी घरकुल योजनेअंतर्गत राज्यामध्ये २१०१४ घरकुले मंजूर करण्यात आली असून आजतागायत २०,४३० लाभार्थ्यांना पहिला हप्ता, १५,२१३ लाभार्थ्यांना दुसरा हप्ता व ६,६८२ लाभार्थ्यांना तिसऱ्या हप्त्याची रक्कम वितरीत करण्यात आली आहे.

(२) व (३) सन २०१५-१६ व २०१६-१७ या दोन वर्षाकरिता शबरी आदिवासी घरकुल योजनेअंतर्गत पुणे जिल्हयाकरीता ८०७ लक्षांक होता. त्यापैकी माहे, जानेवारी २०१८ अखेर १८७ घरकुलाचे बांधकाम पुर्ण झाले असून उर्वरीत घरकुलाचे बांधकाम सुरु आहे.

सन २०१६-१७ या वर्षात शबरी आदिवासी घरकुल योजनेअंतर्गत मंजूर घरकुलांपैकी २०३७४ एवढया लाभार्थ्यांना बांधकाम प्रगतीप्रमाणे रु. १७१४७.६० लक्ष इतकी रक्कम वितरीत करण्यात आलेली आहे.

आदिवासी विकास विभाग, क्र.शघयो-२०१६/ प्र.क्र.३३६/का.१७, दिनांक ६ जानेवारी, २०१७ नुसार ग्रामिण भागाकरीता प्रति घरकुल (शौचालय बांधकामासह) रु. १,३२,०००/- तसेच नक्षलग्रस्त व डोंगराळ (शौचालय बांधकामासह) रु.१,४२,०००/- इतकी वित्तीय मर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

सन २०१५-१६ या वर्षापासून शबरी आदिवासी घरकुल योजनेअंतर्गत घरकुल बांधकामाकरीता “राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण” स्थापन करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्हा नियोजन समितीच्या विकास आराखड्यातील समाजकल्याण विभागातील निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(१९) * ११४७८० श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हा नियोजन समितीच्या विकास आराखडयातील समाजकल्याण विभागातील ५९ कोटी निधीपैकी ७ महिन्यात विकास कामांसाठी प्रशासनाच्या दुर्लक्षपणामुळे फक्त १६ कोटी रुपयेच खर्च झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधी अखर्चित राहिल्यामुळे या विभागातंर्गत जिल्हातील अनेक कामे अपुर्णावस्थेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निधी अखर्चित राहण्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने विकासकामांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच सदर निधी अदयाप अखर्चित ठेवणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

(२), (३) व (४) सांगली जिल्हयासाठी एकूण रू.८१५१.०० लक्ष इतका नियतव्यय मंजूर असून निधी वितरणाच्या निर्बंधानुसार (महसूली ७० टक्के व भांडवली ८० टक्के) रू. ५९२०.९८ लक्षपैकी माहे डिसेंबर, २०१७ अखेर सर्व संबंधित यंत्रणांना मागणीनुसार रू.४४२९.९९ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

शासनाने दि.०१.०२.२०१८ च्या शासन परिपत्रकान्वये अनुसूचित जाती घटक कार्यक्रमांतर्गत १०० टक्के तरतुद वितरीत करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार जिल्हा समाजकल्याण विभागासाठी रू.२२.६३ कोटी वितरीत

असून रू.२०.०० कोटी प्रशासकीय मान्य प्राप्त रकमेपैकी रू.१४.५४ कोटी खर्च झाले आहेत. उर्वरित निधी खर्च करण्याचे निदेश दिले असून निधी व्यपगत न होण्याच्या सक्त सुचना जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर देण्यात आलेल्या आहेत. तसेच, सदर निधी पुर्णपणे खर्च करण्याचे नियोजन जिल्हास्तरावर करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बीड जिल्ह्यातील जीर्ण झालेल्या विद्युत तारा व खांब बदलण्याचे काम तातडीने करण्याबाबत

**(२०) * १०९०४० ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील सन १९८० मध्ये वा त्या दरम्यान उभारण्यात आलेल्या विद्युत तारा व खांब सद्य:स्थितीत जीर्ण व धोकादायक अवस्थेत असून वारंवार तारा व खांब तुटल्याने जनावरे व नागरिक जखमी/मृत्युमुखी पडल्याच्या घटना घडत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उक्त जिल्ह्याची पाहणी केली आहे काय, असल्यास, सदर पहाणीत काय आढळून आले आहे, त्यानुसार महावितरण कंपनीच्या जीर्ण झालेल्या विद्युत तारा व खांब बदलण्याचे काम तातडीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) बीड जिल्ह्यात वाहिनी तुटून जानेवारी, २०१७ ते डिसेंबर, २०१७ दरम्यान एकूण ४ मानवी प्राणांतिक व १३ जनावरांचे प्राणांतिक वीज अपघात झालेले आहेत.

(२) विद्युत निरीक्षण विभाग, बीड कार्यालयामार्फत जिल्ह्यातील जीर्ण झालेल्या विद्युत तारा व खांब तसेच इतर अपघात प्रवण स्थळांचे सर्वेक्षण करण्यात येत असून अपघात प्रवण स्थळाच्या दोष निवारणाकरीता ज्ञापन तसेच कारणे दाखवा नोटीस महावितरण कंपनीस देण्यात आलेल्या आहेत.

संबंधित कामासाठी बीड विभागासाठी रु.१९२.६१/- लाख व अंबाजोगाई विभागासाठी रु.१९६.६५/-लाख एवढया रकमेचे निविदा आदेश महावितरण कंपनीमार्फत देण्यात आले आहेत व सदरील कामे प्रगतीपथावर आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील वरळी येथील बी.डी.डी.चाळीतील इमारतीतील मागासवर्गीयांच्या वसतिगृहांची झालेली दुरवस्था

**(२१) * ११४३१२ श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.प्रदीप नाईक (किनवट), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वरळी येथील बी.डी.डी.चाळ क्रमांक ११८ या इमारतीमध्ये सामाजिक न्याय विभागांतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुलांचे वसतिगृह, संत मिराबाई मुलीचे वसतिगृह व मागासवर्गीय शासकीय मुलांचे वसतिगृह असे तीन मागासवर्गीय वसतिगृहे आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वसतीगृहामध्ये स्वच्छतागृहे, स्नानगृहे तसेच दारे व खिडक्यांची झालेली दुरवस्था, तेथील स्लॅबमधून होणारी पाणी गळती, विजेचे मिटर व विद्युत तारा उघड्या असणे, वसतीगृहाच्या इमारतीमध्ये सांडपाण्याची समस्या व तेथे होणारे अवैध पार्किंग इत्यादी समस्या आहेत, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त वसतीगृहामध्ये बाहेरच्या लोकांनी बेकायदेशीरपणे वास्तव्य करुन अवैधपणे खोल्यांचा ताबा घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने वसतीगृहांमध्ये मुलभूत सुविधा पुरविण्याबाबत तसेच बेकायदेशीर वास्तव्य करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.
(२) या वसतीगृहांच्या देखभाल व दुरूस्तीची कामे वेळोवेळी करण्यात आलेली असून, सदर वसतीगृह सुस्थितीत आहेत.
(३) नाही.
(४) शासन निर्णय दि.२६ जुलै, २०११ मधील तरतूदीनुसार विद्यार्थ्यांना सोयी सुविधा पुरविण्यात येत असून वसतीगृहात बेकायदेशीर वास्तव्य नसल्याने चौकशी करण्याचा वा कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील ५५ लाख शेतीपंपांना अवास्तव वीज देयके पाठवून शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक होत असल्याबाबत

**(२२) * १०६२६५ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र**

**आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.बसवराज पाटील (औसा), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अनिल बाबर (खानापूर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे ५५ लाख कृषिपंपधारक शेतकऱ्यांना अवास्तव वीज देयके आकारण्यात आली असून ६००० कोटींपेक्षा जास्त रक्कम शेतकऱ्यांकडून महावितरणने वसूल केली असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील विशेषत: सातारा, लातूर व मराठवाडयातील प्रत्येक जिल्हयात प्रत्यक्ष जागेवर जावून विद्युत मिटरची पाहणी न करता संगणकाद्वारे अवास्तव वीज देयके तयार करण्यात येऊन सदरची वीज देयके भरण्यासाठी सक्ती करुन डी.पी. वरुन वीजपुरवठा बंद करण्यात येत असून सर्व शेतकऱ्यांनी वीज देयके भरल्याशिवाय वीज कनेक्शन जोडता येणार नसल्याचे महावितरणने सांगितले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, महावितरण कंपनीने शेतीपंप वीज ग्राहकांकडे कोट्यवधी रुपयांची थकबाकी दाखवून २१ हजार कोटींचा दाखवलेला ताळेबंद चुकीचा असून शेतकऱ्यांना चुकीची देयके देणे, विज नियामक आयोगाला फसवणे असे आरोप महाराष्ट्र राज्य वीज ग्राहक संघटनेने माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दिनांक १ मार्च, २०१७ अखेरचे बोगस व वाढीव वीज देयक रद्द करुन थकीत मुद्दल दाखविणारे अचूक देयक देण्यात यावे, कृषी संजीवनीसाठी खऱ्या थकीत मुद्दल रक्कमेत ५० टक्क्यांनी सुट देण्यात यावी, यासह अन्य मागण्यांप्रश्नी राज्यातील ५ लाख शेतीपंप वीज ग्राहकांचे तक्रार अर्ज दाखल करण्याचे राज्यव्यापी आंदोलन महाराष्ट्र राज्य वीज ग्राहक संघटनेने सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या मागण्यांबाबत महाराष्ट्र राज्य वीज ग्राहक संघटनेने दिनांक २८ नोव्हेंबर, २०१७ रोजी महावितरणचे सहव्यवस्थापकीय संचालक औरंगाबाद विभाग तसेच मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १५ डिसेंबर, २०१७ मध्ये लेखी निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) संबंधित संघटनेचे निवेदन महावितरणला प्राप्त झालेले आहे.

(४) असे आढळून येत नाही.

(५) संबंधित संघटनेचे दिनांक २८.११.२०१७ रोजीचे निवेदन प्राप्त झालेले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पनवेल नगरपालिकेने राखीव ठेवलेल्या भूखंडावर खाजगी गृह प्रकल्पाकरिता अनधिकृत विद्युत सबस्टेशन उभारण्यात आल्याबाबत

**(२३) * १०९२३७ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल नगरपालिकेने विद्युत सबस्टेशन उभारण्याकरीता महावितरण कंपनीसाठी राखीव ठेवलेल्या १८१२ चौ.मी. च्या भूखंडावर कल्पतरु रिव्हर साईट प्रोजेक्ट कंपनीने खासगी गृह प्रकल्पासाठी ३३/११ के.व्ही. चे अनधिकृत विद्युत सबस्टेशन उभारुन आर्थिक गैरव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी सन २०१५ मध्ये प्रधान सचिव, ऊर्जा विभाग यांना सादर झालेल्या चौकशी अहवालावर शासनाने कोणतीच कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कल्पतरु रिव्हर साईट प्रोजेक्ट कंपनीने विद्युत सब-स्टेशनसाठीच्या भूखंडावर अवैधपणे अतिक्रमण करुन ताबा घेतल्याने विकासकाविरुध्द कायदेशीर कारवाई करणेबाबत व भूखंड ताब्यात घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) महावितरण कंपनी यांच्या मागणीनुसार व पनवेल नगरपरिषद सर्वसाधारण सभा ठराव क्र. ६०४, दि. ०४.०५.२०१० यांच्या मान्यतेनुसार १८१२.०० चौ.मी. ॲमिनिटी स्पेसमध्ये रिसिव्हींग स्टेशनसाठी जागा पूर्वाश्रमीच्या नगरपरिषदेने महावितरण कंपनी यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यानुसार महावितरण कंपनी यांनी रिसिव्हींग स्टेशन उभारलेले आहे. सदरील उपकेंद्रामुळे पनवेल शहराची वीज समस्या दूर होण्यास मदत झाली आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्हयात विविध ठिकाणी होणारी अवैध दारु विक्री

**(२४) * १०६३६३ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयात विविध ठिकाणी अवैध दारु विक्रीवर विभागाने कारवाई करुन सुमारे २५ लाखांचा मुद्देमाल जप्त करुन १३४ गुन्हयांची नोंद केली असून ८२ आरोपींना अटक केल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच येथील तोफखाना परिसरातून सोळा तोटी, कारंजा येथून मानवी आरोग्यास अपायकारक असलेली विषारी पदार्थ टाकून बनवलेली सुमारे २३० लिटर बनावट ताडी पोलिसांनी दिनांक १९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास हस्तगत केल्याचेही उघड झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या दोन्ही प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार त्यातील दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) होय.

(३) अहमदनगर जिल्हयात राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून अवैध मद्य व हातभट्टी दारू धंद्याविरूध्द दि.१.१२.२०१७ ते दि.२५.१२.२०१७ या कालावधीत एकूण १३४ गुन्हे नोंदविण्यात आले असून यामध्ये ८२ आरोपींना अटक करून रु.२५.४७ लाखाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस विभागाकडूनही माहे डिसेंबर, २०१७ मध्ये अवैध दारु व्यवसायासंदर्भात एकूण १४९ गुन्हे दाखल करण्यात येवून ९ आरोपींना अटक करून त्यांचेकडून रु. ३ लाखाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

तसेच, पोलीस विभागाकडून सोळा तोटी, कारंजा, तोफखाना येथून दोन इसमांना अटक करून त्यांचेकडून २३० लिटर बनावट ताडी जप्त केली असून तोफखाना पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि. क्र.४४/२०१८ नोंदविण्यात आला आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागानेही दि.२०.१२.२०१७ व दि.२७.१२.२०१७ रोजी केलेल्या कारवाईमध्ये एकूण ३७५ लिटर ताडी जप्त केली असून गुन्हा.र.क्र.२३३/२०१७ व गुन्हा र.क्र.२९७/२०१७ नोंदविला आहे. यामध्ये एकूण ७ आरोपींना अटक करण्यात आली असून पुढील आवश्यक ती कारवाई करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सेलसुरा (ता.जि.हिंगोली) येथील दलित वस्तीमध्ये नवीन रोहित्र बसविण्याबाबत

**(२५) * ११४५१२ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेलसुरा (ता.जि.हिंगोली) येथील दलित वस्तीतील गावठाणात गत तीन महिन्यांपासून रोहित्रात वारंवार बिघाड होत असून याकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्यामुळे वीज पुरवठा होत नसल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे येथील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासह अनेक समस्यांचा सामना करावा लागत असून यासंदर्भात नागरिकांनी महावितरणकडे वारंवार निवेदन देवूनही याकडे अधिकारी दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार नागरिकांच्या तक्रारीकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच नवीन रोहित्र बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

मौजे सेलसुरा या गावामधील दलीत वस्तीला वीज पुरवठा जिल्हा परिषद शाळेजवळील २५ के.व्ही.ए. च्या तीन वितरण रोहित्रांपैकी २ सिंगल फेज रोहित्रांवरुन होत होता. माहे नोव्हेंबर, २०१७ अखेर दोन सिंगल फेज रोहित्रांपैकी एक सिंगल फेज रोहित्र नादुरुस्त झाले होते. तेव्हा नादुरुस्त झालेल्या रोहित्रांवरील ग्राहकांना उर्वरित चालू असलेल्या एका सिंगल फेज रोहित्रावरुन वीज पुरवठा करण्यात आला. त्यामुळे मौजे सेलसुरा येथील दलीत वस्तीतील ग्राहकांचा वीज पुरवठा त्वरीत चालू झाला व सद्यस्थितीत मौजे सेलसुरा गावातील वीज पुरवठा सुरळीत चालू आहे.

(२) गावातील पाणी पुरवठा हा कृषीपंप रोहित्रावरुन होत असून सदरील पाणी पुरवठा सुरळीतपणे चालू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिरूर (जि.पुणे) तालुक्यातील कोरेगाव भिमा, शिक्रापूर, शिरूर येथील महावितरण कार्यालयांतर्गत वीज पुरवठा सुरु करण्याबाबत

**(२६) * ११३४२५ श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरूर (जि.पुणे) तालुक्यातील कोरेगाव भिमा, शिक्रापूर, शिरूर या कार्यालयांतर्गत असलेल्या गावांमधील रोहित्रे महावितरण कंपनीने बंद केल्याचे दिनांक १ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या ग्राहकांचे विज बील थकीत आहेत अशा शेतकऱ्यांचाच विज पुरवठा खंडीत करणे गरजेचे असताना संपूर्ण रोहित्रच बंद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विज बील थकबाकीचे कारण देवून विज ग्राहकांचा विज पुरवठा बंद करण्याअगोदर विज कायदा २००३ चे कलम ५६ नुसार १५ दिवस अगोदर लेखी नोटीस देणे बंधनकारक असतानाही विज ग्राहकांना लेखी नोटीसा न देता थेट विजपुरवठा बंद करण्याचा निर्णय व्यवस्थापकीय संचालक यांनी घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने थकबाकी नसलेल्या ग्राहकांचा वीज पुरवठा खंडीत न करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) थकीत कृषीपंप ग्राहकांनी वीज देयकाचा भरणा केल्यानंतर वीज पुरवठा सुरु करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चाकण (ता.खेड, जि.पुणे) येथील औद्योगिक क्षेत्रामध्ये कामगारांसाठी सोई-सुविधा पुरविण्याबाबत

**(२७) * ११४९०० श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकण (ता.खेड, जि.पुणे) येथील औद्योगिक क्षेत्रामधील टप्पा क्र.१ ते ४ मध्ये हजारो हेक्टर जमिनीवर अनेक प्रकारचे उद्योग उभारण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर औद्योगिक वसाहतींच्या परिसरात कामगारांच्या सुरक्षेसाठी अग्निशमन केंद्र, करमणूक केंद्र, रस्ते, कम्युनिटी हॉल, आरोग्य केंद्र, पोलीस स्टेशन, वाहतूक व्यवस्था, बगीचे अशा सोई-सुविधा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी लेखी मागणी मा.उद्योग मंत्री यांचेकडे दिनांक १७ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार चाकण औद्योगिक क्षेत्रामध्ये सोई-सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय.

(२) व (३) होय.

अ) चाकण औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र. ४ मध्ये अग्निशमन केंद्र कार्यान्वीत असून तेथून महामंडळाच्या टप्पा क्र. २ ते ४ येथील सर्व औद्योगिक क्षेत्रामध्ये अग्निशमन सेवा पुरविण्यात येते. आवश्यकतेनुसार भविष्यात चाकण औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र. २ भूखंड क्र. AM २६ हा १०५७० चौ. मी. क्षेत्रफळाचा भूखंड अग्निशमन केंद्रासाठी राखून ठेवण्यात आला आहे.

ब) चाकण टप्पा क्र. ३ व ४ मधील मुख्य व अंतर्गत रस्ते पूर्ण झाले असून औद्योगिक क्षेत्रे विकसीत झालेली आहेत. तसेच चाकण टप्पा क्र. २ मधील साधारणत: ७५ टक्के रस्ते व जलवितरीकांचे काम पूर्ण झाले असून उर्वरित कामे भूसंपादन प्रश्नांची सोडवणूक झाल्यानंतर पूर्ण करणे नियोजित आहेत.

क) त्याचप्रमाणे चाकण औद्योगिक क्षेत्र टप्प क्र. २ मधील AM १ भूखंड पोलीस स्टेशनकरीता राखीव ठेवण्यात आला आहे. चाकण औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र. २ मध्ये जवळपास २०,००० वृक्ष लागवड करण्यात आली असून रस्त्यांच्या मध्यभागी देखील शोभेची झाडे लावण्यात आलेली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमळनेर (जि.जळगांव) येथील आदिवासी समाजासाठी सांस्कृतिक सभागृहाच्या बांधकामास मंजूरी मिळणेबाबत

**(२८) * ११३२७१ श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमळनेर (जि.जळगाव) येथील आदिवासी समाजासाठी असलेल्या आदिवासी सांस्कृतिक सभागृहाच्या बांधकामासाठी मंजूरी मिळावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ७ फेब्रुवारी, २०१७ च्या पत्रान्वये मा.आदिवासी विकास मंत्री यांच्याकडे केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.आदिवासी विकास मंत्री यांनी सदरहू प्रकरणी मा.आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक यांना कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने अद्यापर्यंत कार्यवाही केली नसून याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले,

(४) असल्यास, त्यानुसार सांस्कृतिक सभागृहाच्या बांधकामासाठी मंजूरी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय.

(२) विभागाच्या दिनांक ८.२.२०१७ च्या पत्रान्वये आवश्यक प्रस्ताव विहित माहितीसह सादर करण्याबाबत आयुक्त, आदिवासी विकास नाशिक यांना कळविण्यात आले होते.

(३) व (४) अमळनेर (जि.जळगांव) येथील सांस्कृतिक सभागृहासाठी अमळनेर नगरपरिषदेकडून ५००० चौ.मी. जागा उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही सुरु असून सदर जागा अमळनेर नगरपरिषदेकडून उपलब्ध झाल्यानंतर या प्रस्तावावर पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## मौजे धेरंड व शहापूर (ता.अलिबाग, जि.रायगड) गावातील टाटा पॉवर कंपनीने वीज प्रकल्पाकरिता संपादित केलेल्या जमिनी प्रकल्पग्रस्तांना परत करण्याबाबत

**(२९) * १०६४६७ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे धेरंड व शहापूर (ता.अलिबाग, जि.रायगड) गावातील टाटा पॉवर कंपनीने वीज प्रकल्पाकरिता संपादित केलेल्या जमिनी प्रकल्पग्रस्तांना परत करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.उर्जा मंत्री यांच्याकडे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा प्रशासनासोबत आयोजित केलेल्या बैठकीमध्ये टाटा कंपनीने नागरी सुविधांकरिता दोन कोटी रूपये व प्रकल्पग्रस्त कुटूंबातील मुलांना प्रशिक्षण देऊन प्रकल्पामध्ये नोकरीत सामावून घेण्याच्या दिलेल्या आश्वासनानंतर शेतकऱ्यांनी आपल्या पिकाऊ जमिनी प्रकल्पासाठी संपादित करण्यास परवानगी दिली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण होऊन बराच कालावधी होऊन सुध्दा टाटा कंपनीने प्रकल्प स्थापनेचा कोणत्याही प्रकारचा प्रयत्न अद्यापपर्यंत केला नसून सदर जमिनी ह्या खाडीलगत असल्यामुळे बांध-बंधिस्ती न झाल्यामुळे खाडीचे खारे पाणी शेतात शिरून जमिनी नापिक झाल्यामुळे शेतकऱ्यांचे शेतीचे उत्पन्नही कमी झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार टाटा पावर कंपनीच्या प्रकल्पाकरिता संपादित केलेल्या जमिनी प्रकल्पग्रस्तांना परत करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) महाराष्ट्र शासन व टाटा पॉवर कंपनी मर्या. यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य करारानुसार व मा. मुख्यमंत्री यांच्या समवेत झालेल्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार महानिर्मिती कंपनी व टाटा पॉवर कंपनी मर्या. यांच्या संयुक्त उपक्रमाव्दारे धेरंड येथे वीज प्रकल्प उभारणे प्रस्तावित आहे.

खाडी लगतच्या बंधारासाठी टाटा कंपनीकडून या पूर्वी सुमारे रु. ६० लाख इतकी रक्कम बंधाऱ्याच्या दुरुस्ती आणि जिर्णोधाराकरिता करण्यात आली असून परत गरज भासल्यास बंधाऱ्याच्या संरक्षणासंदर्भात टाटा कंपनीकडून आवश्यक कार्यवाही करण्यात येईल असे टाटा पॉवर कंपनीने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## इतर मागासवर्गीय आणि अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीचे वाटप केले नसल्याबाबत

**(३०) * ११३७५३ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी),**

**श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या सामाजिक न्याय विभागाची संकेतस्थळ बंद असल्यामुळे इतर मागासवर्गीय आणि अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीचे वाटप केले नसल्याचे दिनांक १५ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी केंद्राने सुमारे ६०० कोटी रुपये देणे अपेक्षित असताना केवळ ७७ कोटी ९२ लाख इतकी शिष्यवृत्तीची रक्कम दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्व मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी केंद्र शासनाने सन २०१७-१८ मध्ये निधीच उपलब्ध करुन दिलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.

(२) सन २०१६-१७ साठी केंद्र शासनाकडून इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी रु.७७.९२ कोटी इतका निधी प्राप्त झाला आहे.

(३) नाही, केंद्रशासनाकडून अनुसूचित जाती प्रवर्गासाठी सन २०१७-१८ मध्ये रु.५०४.९७ कोटी इतका निधी प्राप्त झाला आहे. तर इमाव प्रवर्गासाठी सन २०१७-१८ साठी रु. ५४.४४ कोटी इतका निधी प्राप्त झाला आहे.

(४) महा-डिबीटी प्रणाली पूर्णत: कार्यान्वित झालेली नसल्याने अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे अर्ज ऑफलाईन पध्दतीने स्विकारुन त्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यावर शिष्यवृत्ती/फ्री-शिप ची रक्कम जमा करण्याची

कार्यवाही या विभागामार्फत करण्यात येत असून, त्याच स्वरुपाची कार्यपध्दती विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी त्या विभागाकडून अवलंबिण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्हयातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना मोबदला देण्याबाबत

**(३१) * ११३०२६ श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातील पोनी-२ व पोनी-३ च्या प्रकल्पग्रस्त शेतक-यांच्या शेतजमिनी वेस्टर्न कोलफील्ड्स लिमिटेडने (वेकोलि) अधिग्रहित केल्यानंतर पोनी-२ च्या ४२ व पौनी-३ च्या ७१० अशा एकूण ७५२ शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला देण्यास कंपनी टाळाटाळ करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या विदर्भ किसान मजदूर या संघटनेने जिल्हाधिकारी, चंद्रपूर कार्यालयासमोर दिनांक ८ जानेवारी, २०१८ रोजी धरणे आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.
(२) या संदर्भात शेतकऱ्यांनी उपोषण केले होते, हे खरे आहे.
(३) होय.
(४) सदर प्रकरण पुर्णत: वेकोली, कोळसा मंत्रालय, भारत सरकार यांचे विचाराधीन आहे.
(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## सोनगाव (ता.निफाड, जि.नाशिक) येथील विद्युत रोहित्राच्या शॉर्टसर्किटमुळे शेतकऱ्यांच्या ऊसाचे नुकसान झाल्याबाबत

**(३२) * ११५२९३ श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनगाव (ता.निफाड, जि.नाशिक) येथील गोदाकाठ भागातील विद्यूत रोहित्राच्या शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीत शेतकऱ्यांचा ऊस जळून लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचे दिनांक २८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोनगावमध्ये शॉर्टसर्किटमुळे रोहित्र जळून आग लागण्याच्या तीन घटना यापूर्वी घडूनही महावितरणने अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) मुख्य विद्युत निरीक्षक यांच्या अहवालानुसार सदरची आग ही महावितरण कंपनीच्या विद्युत संच मांडणीमुळे व विद्युत कारणाने लागलेली नाही.

(२) पूर्वीच्या ऊस जळीताच्या तीनही घटनांमध्ये त्याठिकाणी देखील लागलेली आग ही महावितरण कंपनीच्या विद्युत संच मांडणीमुळे व विद्युत कारणाने लागलेली नाही.

(३) सदरहू सर्व दुर्घटनांची चौकशी विद्युत निरीक्षक, नाशिक यांनी केली असून सदर सर्व घटनांमध्ये महावितरण कंपनी जबाबदार नाही असे आढळून आले असल्याने नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खंडाळी व गुगदळ (ता.अहमदपूर, जि.लातूर) येथे ३३ के.व्ही. विद्युत उपकेंद्राचे काम पूर्ण करण्याबाबत

**(३३) * १११८६६ श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.मोहन फड (पाथरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खंडाळी व गुगदळ (ता.अहमदपूर, जि.लातूर) येथे ३३ के.व्ही. विद्युत उपकेंद्राचे भूमिपूजन माहे मे, २०१७ मध्ये झाले असतानाही सदर विद्युत उपकेंद्राच्या उभारणीचे काम अद्यापपर्यंत सुरु झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उपकेंद्राच्या उभारणीस विलंब होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर उपकेंद्र तातडीने उभारण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) सदर प्रश्नात उल्लेख केलेल्या उपकेंद्राचे नाव गुगदळ नसुन हगदळ आहे. सदर खंडाळी व हगदळ या उपकेंद्रांच्या कामाचा समावेश दीनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेत करण्यात आला आहे. सदर कामाचे कंत्राट दि. २.३.२०१७ रोजी देण्यात आले असून कंत्राटदाराकडून कामाची सुरुवात करण्यात आलेली आहे.

(२) फेब्रुवारी, २०१८ अखेरीस सदर काम पूर्ण करणे अपेक्षित होते. तथापि, कंत्राटदाराच्या कामाचा वेग पुरेसा नसल्याने सदर कामास विलंब होत आहे.

(३) कंत्राटदारास कामाचा वेग वाढवण्यासाठी व दिलेले उद्दिष्ट विहित वेळेत पूर्ण करण्यासाठी दि. १९.०९.२०१७ च्या पत्रान्वये महावितरण कंपनीकडून सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच सहमतीने ठरविण्यात आलेली कामे विहित वेळेत पूर्ण न झाल्यामुळे निविदेतील नियम व अटीनुसार कारवाई करण्याबाबत कंत्राटदारास दि. ७.१२.२०१७ व ९.१.२०१८ रोजीच्या पत्रान्वये "नोटीस टु करेक्ट" (Notice to Correct) देण्यात आलेल्या आहेत. तसेच

सदर कंत्राट का संपुष्टात आणू नये याची विचारणा करणारी कारणे दाखवा नोटीसही दि. २१.२.२०१८ रोजी कंत्राटदारास बजावण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्हयात ९५०० कृषीपंप वीज जोडण्या पैसे भरुन प्रलंबित असल्याबाबत

**(३४) * ११३९१० डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जिल्हयात ९५०० कृषीपंप वीज जोडण्या शेतकऱ्यांनी पैसे भरुनही प्रलंबित असून महावितरणने शेतकऱ्यांना “विजमंडळ आपल्या दारी” या योजनेतून तात्पुरत्या वीजजोडण्या दिल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रलंबित विज जोडण्या देण्याबाबत १५० कोटी निधीची आवश्यकता असून महावितरण कपंनीने शासनाकडे निधीची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जळगाव जिल्हयातील किती तालुक्यांमध्ये जोडण्या प्रलंबित आहेत तसेच उपरोक्त योजनेचे काम अपूर्णावस्थेत असण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार निधी देऊन प्रलंबित जोडण्या तात्काळ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :**(१) जळगांव जिल्हयात जानेवारी, २०१८ अखेर ९६८८ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित आहेत. तसेच “महावितरण आपल्या दारी” योजनेअंतर्गत सदर जिल्हयात ११५०० कृषीपंपांना केबलद्वारे वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत.
(२) हे खरे आहे.

(३) जळगांव जिल्हयातील १५ तालुक्यांमध्ये जानेवारी, २०१८ अखेर ९६८८ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित आहेत.

(४) विविध योजनांतर्गत सदर कामे महावितरण कंपनीमार्फत करण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्हयातील शेतकऱ्यांना सोयाबीन अनुदानाची रक्कम मिळण्याबाबत

**(३५) * १११५१२ श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोयाबीनचे बाजारातील भाव माहे ऑक्टोबर ते दिनांक ३१ डिसेंबर, २०१६ मध्ये कमी झाल्याने राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने विविध बाजार समित्यांमध्ये प्रतिक्विंटल मागे २०० रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाच्या अनुषंगाने अद्यापही हिंगोली जिल्हयातील शेतकऱ्यांचे २ कोटी ८१ लाख ४८ हजार रुपये अनुदान मिळालेले नसल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अनुदानातील रकमेसाठी शेतकऱ्यांनी वारंवार बँकेत पाठपुरावा करुनही कोणतीच कार्यवाही झालेली नसून हिंगोली जिल्हयातील शेतकऱ्यांचे अनुदान प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शेतकऱ्यांना तातडीने अनुदान मिळण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.

(२) नाही.

(३) व (४) शासन निर्णय,दिनांक २६.१०.२०१७ अन्वये राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान देण्यासाठी रुपये १०८.६४ कोटी इतका निधी आकस्मिकता निधीतून उपलब्ध करुन वितरीत करण्यात आला आहे.हिंगोली जिल्हयातील १७५११ शेतकऱ्यांना रुपये ५,६७,१२,३५२.२०/- इतके सोयाबीन अनुदान मंजूर केले असून त्यापैकी दिनांक १५.२.२०१८ अखेर १७३२२ शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर रुपये ५,४२,३६,१८५/- इतके अनुदान वर्ग करण्यात आले आहे. उर्वरित १८९ शेतकऱ्यांच्या बँक खात्यांच्या तपशिलात त्रुटी असल्याने रुपये २४,७६,१६७/- इतके अनुदान संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करणे शक्य झाले नाही.

तथापि, त्रुटीची पूर्तता करुन अनुदान बँक खात्यावर वर्ग करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उस्मानाबाद जिल्हयातील तुळजापूर विभागातील मराठवाडा-विदर्भ पॅकेज अंतर्गत मंजूर करण्यात आलेली कामे पूर्ण करण्याबाबत

**(३६) * ११२९९८ श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयातील तुळजापूर उपविभागाचे विभाजन करून नवीन नळदुर्ग उपविभाग करण्याबाबत कार्यवाही झालेली नसून तुळजापूर तालुक्यातील बारूळ येथे ३३ केव्हीए सबस्टेशन, देवकुरुळी येथे ३३ केव्हीए सबस्टेशन, नंदगाव येथे नवीन ३३ केव्हीए सबस्टेशन प्रस्तावित असून अद्यापही कार्यान्वित करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तुळजापूर विभागात मराठवाडा-विदर्भ पॅकेज अंतर्गत मंजूर करण्यात आलेले रोहित्र बसवणे, L.T. लाईन व H.T. लाईन टाकणे ही कामे सन २०१५ पासून सुरु असून अद्यापही अपूर्ण आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तुळजापूर तालुक्यातील फुलवाडी, माळुंब्रा, तुळजापूर ग्रामीण-२ व सलगरा ही ३३ केव्हीए सबस्टेशन अतिभारीत असल्यामुळे या सबस्टेशन

अंतर्गत येणाऱ्या सर्व कृषिपंपाना तीन पाळ्यांमध्ये वीज पुरवठा करण्यात येत असल्याने वीजपुरवठा सुरळीतपणे व पुरेशा दाबाने होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार नवीन नळदुर्ग उपविभाग निर्माण करण्याबाबत, तुळजापूर तालुक्यात मंजूर सबस्टेशन कार्यान्वित करुन अपूर्ण कामे पूर्ण करण्याबाबत व अतिभारित सबस्टेशनवरुन होणारा वीजपुरवठा सुरळीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे** : (१) महावितरण कंपनीमार्फत नवीन कार्यालय निर्मितीचे मानके व कर्मचारी/ग्राहक मानके निश्चित केल्यानंतर आर्थिक दायित्वाचा विचार करुन धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल. तद्नंतर सदर प्रस्तावावर महावितरण कंपनीकडून कार्यवाही करण्यात येईल.

तुळजापूर तालुक्यातील बारुळ येथील नवीन ३३/११ केव्ही उपकेंद्राचे काम पं. दिनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजनेंतर्गत समाविष्ट केले असून ते मे, २०१८ पर्यंत पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे.

तुळजापूर तालुक्यातील देवकुरुळी येथील नवीन ३३/११ के.व्ही. उपकेंद्राचा प्रस्ताव महावितरण कंपनीमार्फत प्रस्तावित आहे.

तसेच तुळजापूर तालुक्यातील नंदगाव येथे नवीन ३३/११ के.व्ही. केंद्र प्रस्तावित नसून लोड सेंटर व विद्यमान लोडनुसार सिंदगाव येथे नवीन ३३/११ के.व्ही. उपकेंद्र महावितरण कंपनीमार्फत प्रस्तावित आहे.

(२) तुळजापूर विभागात मराठवाडा-विदर्भ पॅकेज अंतर्गत मंजूर करण्यात आलेले रोहित्र बसविणे, एल.टी. व एच.टी. लाईन टाकणे, ही कामे सन २०१५ पासून विविध ठेकेदारांना कार्यादेश देऊन करुन घेण्यात येत आहे. तसेच निधीच्या उपलब्धतेनुसार उर्वरित कामे करण्यात येणार आहे.

(३) तुळजापूर तालुक्यातील फुलवाडी व माळुंब्रा येथील ३३/११ के.व्ही उपकेंद्रे कृषिपंपाचा हंगामी लोड वाढल्यामुळे अतिभारीत झाले असून तेथे ११ के.व्ही.च्या कृषिवाहिनी ८ तासांच्या तीन पाळ्यांमध्ये वीज पुरवठा करण्यात येत आहे. तुळजापूर ग्रामीण २ शाखा कार्यालयांतर्गत असणाऱ्या सलगर

३३/११ के.व्ही उपकेंद्रामध्ये नवीन अतिरिक्त ५ एम.व्ही.ए. क्षमतेचा रोहित्र कार्यान्वित करण्यात आल्याने तेथील ११ के.व्ही. कृषिवाहिनी कंपनीने निर्देशित केलेल्या वेळापत्रकानुसार २ पाळ्यांमध्ये चालू आहे. तसेच फुलवाडी, सलगरा व माळुंब्रा ही ३३/११ के.व्ही.ए. उपकेंद्रातर्गत येणाऱ्या कृषिपंपाना नियमित दाबाने वीज पुरवठा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्हयातील अनुसूचित जाती उपयोजनांसाठीचे कोट्यवधी रुपये अखर्चित राहिल्याबाबत

**(३७) * ११३९९० डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयात अनुसूचित जाती उपयोजनांसाठीचे सुमारे ४७ कोटी रुपये गत आठ महिन्यांपासून अखर्चित असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधी अखर्चित राहण्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) व (३) कोल्हापूर जिल्हयासाठी एकूण रू.११३४१.०० लक्ष इतका नियतव्यय मंजूर असून निधी वितरणाच्या निर्बंधानुसार (महसूली ७० टक्के व भांडवली ८० टक्के) रू. ८०४६.८० लक्षपैकी माहे डिसेंबर, २०१७ अखेर सर्व संबंधित यंत्रणांना मागणीनुसार रू.५२०५.२५ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

शासनाने दि.०१.०२.२०१८ च्या शासन परिपत्रकान्वये अनुसूचित जाती घटक कार्यक्रमांतर्गत १०० टक्के तरतुद वितरीत करण्यास मान्यता दिली आहे. त्याअनुषंगाने संबंधित यंत्रणांना रू.१०६८०.६७ लक्ष निधी वितरीत करण्यात आला असून त्यापैकी १००% निधी खर्च करण्याचे निदेश दिले असून निधी व्यपगत न होण्याच्या सक्त सुचना जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर सर्व संबंधित विभाग प्रमुखांना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मांजरी, पुणे येथील शासकीय आदिवासी मुलांच्या वसतीगृहातील विद्‌यार्थ्यांनी त्यांच्या विविध मागण्यांकरीता बेमुदत उपोषण सुरु केल्याबाबत

**(३८) * १०८२८७ श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री. शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री. सरदार तारासिंह (मुलुंड), श्री. सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील हडपसर जवळील मांजरी येथील शासकीय आदिवासी मुलांच्या वसतीगृहात विद्‌यार्थ्यांना गृहपालाकडून देण्यात येणारा मानसिक त्रास,अपुऱ्या शैक्षणिक सुविधा, शैक्षणिक शुल्क, अभ्यासिकेची दुरवस्था, वसतिगृहात अनेक विद्‌यार्थी अनधिकृतरित्या राहत असणे आदी समस्यांबाबत दिनांक १५ डिसेंबर, २०१७ पासून विद्‌यार्थ्यांनी बेमुदत उपोषण सुरु केल्याची बाब दिनांक १६ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आदिवासी वसतीगृहातील तीन विद्‌यार्थ्यांना बेमुदत उपोषण करत असताना उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून विद्‌यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या अपुऱ्या सुविधांबाबत उपोषण करणाऱ्या विद्‌यार्थ्यांवर गृहपालांकडून खोटे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विद्यार्थ्यांना भेटण्याकरीता व चर्चा करण्याकरीता शासकीय अधिकारी गेले असता उपोषण मागे घेण्यास विद्यार्थ्यांनी नकार देणे, तसेच आंदोलनाचे वार्तांकन करण्यास गेलेल्या वार्ताहरास सहाय्यक पोलीस आयुक्त यांनी जबरदस्तीने पोलीस व्हॅन मध्ये बसवून मारहाण करुन, मोबाईल मध्ये चित्रीत केलेले चित्रण काढून टाकले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चोकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे आहे.

(२) उपोषण करणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी ५ विद्यार्थ्यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करावे लागले.

वसतीगृहात अनधिकृतपणे वास्तव्य करत असणारे ४ विद्यार्थी वसतीगृहातील इतर विद्यार्थ्यांना त्रास देत असल्याची बाब संबंधित वसतीगृहाच्या गृहपालांना निदर्शनास आल्याने त्यांनी सदर विद्यार्थ्यांना पोलिस स्टेशनमध्ये नेऊन त्यांच्याकडून माफीनामा लिहून घेतला. सदर विद्यार्थ्यांवर कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही.

(३) हे खरे आहे.

(४) वसतीगृहातील विद्यार्थ्यांनी केलेल्या उपोषणाच्या घटनेची उपायुक्त, अपर आयुक्त, ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीने चौकशी केलेली आहे.

त्यानुषंगाने वसतीगृहातील विद्यार्थ्यांना क्रीडा साहित्य, इंटरनेट, स्पर्धा परिक्षा पुस्तके, वॉटर कुलर इत्यादी साहित्य पुरविण्यात आलेले आहे. विद्यार्थ्यांना माहे डिसेंबर, २०१७ पर्यंतचा निर्वाह भत्ता अदा करण्यात आलेला असून शैक्षणिक शुल्कासाठी अर्ज केलेल्या पात्र विद्यार्थ्यांना सन २०१५-१६ व २०१६-१७ मधील शैक्षणिक शुल्क अदा करण्यात आलेले आहे. तसेच संबंधित वसतीगृहाचे गृहपाल यांची बदली करण्यात आलेली आहे.

तसेच घटनेशी संबंधित सहायक पोलिस आयुक्त यांची विशेष शाखा-२ (अकार्यकारी पदी), वानवडी विभाग, पुणे येथे अंतर्गत बदली करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील आदिवासीच्या आश्रमशाळा, वसतीगृहांमध्ये पाणी शुध्दीकरण यंत्र (आरओ) बसविण्याबाबत

**(३९) * १०८६३९ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासींच्या आश्रमशाळा व वसतीगृहांमध्ये केंद्र शासनाच्या विशेष सहाय्य योजनेतून पाणी शुध्दीकरण यंत्र (आर.ओ.) बसविण्याकरीता प्राप्त झालेला २५ कोटी रूपयांचा निधी अद्याप खर्च झाला नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आश्रमशाळा व वसतीगृहांत पाणी शुध्दीकरण यंत्र खरेदीसाठी ई-निविदा काढताना त्यात तांत्रिक अडचणी समोर आल्या असून नेमके काय व कोणते साहित्य खरेदी करावे हेच विभागाकडून ठरत नसल्यामुळे हा प्रस्ताव मागील सहा महिन्यांपासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय, त्यानुसार पाणी शुध्दीकरण यंत्र तातडीने बसवण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय हे खरे आहे.

(२), (३) व (४) ज्या आश्रमशाळांमध्ये पाणी शुध्दीकरण यंत्र (आर.ओ) बसवायचे आहेत अशा आश्रमशाळांची माहिती सर्व प्रकल्प अधिकारी यांचेकडून मागविली आहे. सदर माहिती प्राप्त झाल्यानंतर शाळेनुसार किती

क्षमतेचे व कोणत्या प्रकारचे यंत्र पुरवठा करावयाचे याची निश्चिती करून शासनाच्या अंगीकृत उपक्रम महाराष्ट्र पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था (WASSO) या संस्थेकडून पाणी शुध्दीकरण यंत्र व आवश्यक सामुग्री / सुविधा उपलब्ध करून घेण्याचे नियोजन चालू आहे.

-----------------

## माहूर (जि.नांदेड) येथील शासकीय निवासी शाळेतील विद्यार्थीनींना अल्पोपहारातून विषबाधा झाल्याबाबत

**(४०) * ११४८५७ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहूर (जि.नांदेड) येथील सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अनुसूचित जातीच्या मुलींच्या शासकीय निवासी शाळेतील ४१ विद्यार्थिनींना अल्पोपहारातून विषबाधा झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच सदर शासकीय निवासी शाळेतील अल्पोपहार व भोजनाचा दर्जा सुधारण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) सदर निवासी शाळा नांदेड जिल्ह्यामध्ये असून, दि.३१/०१/२०१८ रोजी या शाळेतील विद्यार्थीनींनी त्यांना मळमळ व डोकेदुखीचा त्रास होत असल्याची तक्रार केली होती.

(२) या प्रकरणी प्राथमिक चौकशी करण्यात आली असून, सदर प्रकरणाची सविस्तर चौकशी करण्याकरीता प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, लातूर या कार्यालयातील सहायक संचालक, (वित्त व लेखा) यांच्या अध्यक्षतेखाली चार सदस्यीय समितीची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

(३) प्राथमिक चौकशीत निदर्शनास आलेल्या बाबी विचारात घेऊन भोजन पुरवठादाराचा ठेका रद्द करण्यात आला आहे तसेच त्यांच्यावर कारवाई प्रस्तावित आहे.

संबंधित शाळेचे मुख्याध्यापक व गृहपाल यांना निलंबित करण्यात आले आहे.

(४) नविन भोजन पुरवठाधारकामार्फत मानकाप्रमाणे भोजन पुरवठा करण्याचे प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गडचिरोली येथे आधारभूत धान खरेदी योजनेंतर्गत निकृष्ट दर्जाची बारदाने पुरविण्यात येत असल्याबाबत

**(४१) * ११४०४६ श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास महामंडळ, प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली येथे आधारभूत धान खरेदी योजनेंतर्गत सन २०१७-१८ च्या हंगामामध्ये चंद्रपूर जिल्हयातील ८० ते ९० धान खरेदी केंद्रांमध्ये आवश्यक असणारी बारदाने निकृष्ट दर्जाची पुरविण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गैरकारभाराची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार योग्य दर्जाचे बारदान पुरविण्याबाबत तसेच निकृष्ट दर्जाची बारदाने पुरविण्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) बारदाना खरेदी करीता ई निविदा क्र.२०१७-MSTDC २३९४१२-१ अन्वये नियमानुसार प्रक्रिया राबवून दि.१०.१०.२०१७ रोजी पुरवठादारांसोबत करारनामा करण्यात आलेला आहे. पुरवठादाराने पुरविलेल्या बारदानामधील जर काही बारदाने योग्य नसतील तर ती नाकारण्याचा अधिकार आदिवासी विविध कार्यकारी संस्थांना दिलेला असून या संस्थांकडून बारदानाबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.